# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा

## मराठी विभाग

## अहवाल – २०१७-१८

शैक्षणिक सत्र २०१७ -१८ मध्ये विभागांतर्गत दिनांक १०/०७/०२०१७ ला महाविद्यालयात नवीन प्रवेशित विध्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १०/९/२०१७ ते दिनांक १९/९/२०१७ पर्यंत "मानवी जीवनात मूल्यांचे महत्व" या विषयावर प्रमाणपत्र कोर्स (Certificate Course) घेण्यात आला आहे. मराठी वांङ:मय मंडळाचे गठन दिनांक २६/०९/२०१७ ला मा. प्राचार्य डॉ. उमेकर यांच्या अध्यक्षतेखाली व मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तसेच प्रा. डॉ. गारोडे , प्रा. केदार, प्रा. चुके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्या नुसार दिनांक ४/१०/२०१७ ला स. १०.०० वाजता मराठी वांङ:मय मंडळाचा उद्घाटन समारंभ मा. प्राचार्य डॉ. उमेकर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रा. डॉ. निशा शेंडे जेष्ट समीक्षक तथा सामाजिक कार्यकर्ता आणि मराठी विभाग प्रमुख- महिला महाविद्यालय, अमरावती यंच्या हस्ते, मा. गौतम गुळदे – वर्हाडी कवी यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तर डॉ. गारोडे , प्रा, केदार , प्रा. विपुल चुके यांच्या सहकार्याने संपन्न झाला.

विभागाने दिनांक १३/१०/२०१७ ला वाचन प्रेरणा दिन मा. प्राचार्य डॉ. उमेकर यांच्या अध्यक्षतेखाली व मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात आणि प्रमुख वक्ते डॉ.अजय खडसे व डॉ. चंदू पाखरे यांनी साहित्याचे महत्व सांगून साहित्य निर्मितीस प्रवृत्त व्हावे .या संबधी सखोल मार्गदर्शन केले .

विभागा अंतर्गत दि. ४ .०१.२०१८ ला स .१०.०० वा.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेकर तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात व डॉ.गारोडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कवी कुसुमाग्रज यांच्या जयंत्ती निमित्त 'मराठी भाषा गौरव दिनाचे दि .२७ .०२. २०१८ ला आयोजन केले या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. काशिनाथ बर्हाटे सी.एम. कढी महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, परतवाडा. तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तसेच प्रा. डॉ. गारोडे यांच्या उपस्थितीत सामान्न झाला.

मराठी विभागाच्या वतीने वक्तृत्व, वादविवाद व निबंध स्पर्धेकरिता विविध ठिकाणी विद्यार्थ्यांची पाठवणी करण्यात येते. अंतर्गत मूल्यामापानाच्या दृष्टीने विद्यार्थाचे आकलन व्हावे म्हणून तज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतात.

Principal
B. S. Patil Mahavidyalya
Paratwada Dist. Amravati

प्रा.रवींद्र खंडेराव
मराठी विभाग प्रमुख
बी.एस.पाटील महाविद्यालय
परतवाडा